# बी.ए. भाग III (सेमिस्टर- V, CBCS)
# भूगोल पेपर क्रमांक: E108 or IX
# लोकसंख्या भूगोल (POPULATION GEOGRAPHY)
# Sub. Code: 75548

---

## विभाग I : लोकसंख्या भूगोलचा परिचय

1.लोकसंख्या भूगोल ही कोणत्या भूगोलाची प्रमुख शाखा (उपशाखा) आहे:- **मानवी भूगोल**

2. मानव निर्मित घटकांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे काय:- **लोकसंख्या भूगोल**

3. लोकसंख्या भूगोलाचा जनक कोणास म्हटले जाते:- **जी. टी. त्रिवार्था**

4. कोणत्या वर्षी लोकसंख्या भूगोलाची एक स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून दर्जा प्राप्त झाला:- **1953**

5. अलीकडील काळातील लोकसंख्या भूगोलाचे स्वरूप कोणते:- **गतिशील किंवा परिवर्तनशील स्वरूप**

6. कोणत्या शतकात लोकसंख्या भूगोलाची नवीन शाखा निर्माण झाली:- **विसाव्या शतकात**

7. लोकसंख्या विषयक आकडेवारी प्राप्त करण्याचे महत्त्वाचे साधन कोणते:- **जनगणना (Census)**

8. जनगणना ही माहिती गोळा करण्याचा कोणता स्रोत आहे:- **प्राथमिक सामग्री (Primary Data)**

9. प्राचीन काळी जनगणना करण्याचा मुख्य उद्देश कोणता होता:- **सैन्यभरती करणे, कर आकारणी करणे**

10. जगामध्ये सर्वात प्रथम 1790 मध्ये कोणत्या देशात जनगणना सुरू झाली:- **अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्स**

11. एखाद्या देशातील सर्व लोकांची जन्म,मृत्यू, व्यवसाय, सामाजिक आणि आर्थिक स्थिती याची माहिती संकलित करणे म्हणजे काय:- **जनगणना**

12.एका विशिष्ट वेळी संपूर्ण देशातील किंवा देशाच्या काही प्रदेशातील संपूर्ण लोकांची नियमितपणे केली जाणारी गणती म्हणजे काय:- **जनगणना**

13.संयुक्त राष्ट्रसंघाच्या मार्गदर्शक तत्वानुसार किती वर्षांनी जगामध्ये जनगणना केली जाते:- 10 वर्षांने

14. कोणत्या देशात दर पाच वर्षांनी जनगणना केली जाते:- **ग्रेटब्रिटन, जपान, कोरिया**

15. भारतात कोणत्या साली सर्वप्रथम जनगणना करण्यात आली:- **1872**

16. भारतात आधुनिक पद्धतीने कोणत्या साली जनगणना करण्यात आली:- **1881**

17. Census हा इंग्रजी शब्द लॅटिन भाषेतील कोणत्या शब्दापासून बनलेला आहे:- **Censure**

18. भारतात किती वर्षानंतर जनगणना करण्यात येते:- **10 वर्षानंतर**

19. 2011 मध्ये भारतात जी जनगणना झाली ती कितवी जनगणना होती:- **15वी जनगणना**

20. जन्म, मृत्यू, विवाह, घटस्फोट, वेगळेपणा रद्द करणे आणि दत्तक यासारख्या यासारखी आकडेवारी गोळा करून कशामध्ये प्रसिद्ध केली जाते:- **Registration of vital event or vital statistics**

21. भारतात कोणत्या वर्षी ब्रिटिश सरकारने नोंदणी पद्धत अमलात आणली:-**1886**

22. जागतिक लोकसंख्या दिन जगभर केव्हा साजरा केला जातो:- **11 जुलै**

23.संशोधक किंवा अभ्यासकाने स्वतः प्रत्यक्ष गोळा केलेल्या लोकसंख्येविषयी आकडेवारीस काय म्हणतात:- **प्राथमिक सामग्री (Primary Data)**

24.ज्यावेळी संशोधकांनी गोळा केलेली माहिती प्रसिद्ध केली जाते त्या आकडेवारीस काय म्हणतात:- **दुय्यम माहिती / सामग्री (secondary data)**

25. प्राथमिक माहिती गोळा करण्याचे प्रमुख साधने कोणते:- **निरीक्षण, मुलाखत, प्रश्नावली**

25. दुय्यम माहिती गोळा करण्याचे प्रमुख साधन कोणते:- **प्रकाशित साधने**

26. स्वतंत्र भारताची पहिली जनगणना केव्हा करण्यात आली:- **1951**

## विभाग II

## लोकसंख्या वाढ आणि वितरण (Population Growth and Distribution)

1.भूगोलामध्ये लोकसंख्यावाढ हा शब्द कशासाठी वापरला जातो:- **लोकसंख्येतील बदलासाठी**

2. विशिष्ट कालावधीत लोकसंख्येत झालेला बदल म्हणजे काय:- **लोकसंख्या वाढ**

3. लोकसंख्येत झालेला बदल किती वर्षांनी कळवू शकतो:- **दहा वर्षांनी**

4. लोकसंख्यावाढीचा वेग काढण्यासाठी किती वर्षाचा कालावधी विचारात घेतला जातो:**- एका वर्षाचा**

5. जन्मदर व मृत्युदर यांच्या फरकाला काय म्हणतात:- **नैसर्गिक लोकसंख्या वाढ**

6. लोकसंख्या वाढीचा दर कोणत्या कोणत्या परिमाणात सांगितला जातो:- **टक्केवारी**

7. 2011 च्या जनगणनेनुसार जागतिक लोकसंख्या वाढीचा वार्षिक दर किती टक्के होता:-**1.05 %**

8. 11 जुलै 1987 रोजी जगात पाच अब्जाचे अपत्य जन्माला आले तेव्हापासून कोणता दिवस साजरा केला जातो:- **विश्व लोकसंख्या दिन**

9. जागतिक लोकसंख्या वाढीचे प्रमुख कारण कोणते:- **सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता, रोगप्रतिबंधक लस, राहणीमानाचा दर्जा.**

10. जगात लोकसंख्येच्या दृष्टीने भारताचा कितवा क्रमांक लागतो:- **दुसरा**

11. कोणत्या जनगणनेमध्ये भारतात लोकसंख्या वाढीचा दर ऋण (-) होता:- **1921**

12. जगात कोणत्या खंडात सर्वात जास्त लोकसंख्या आढळते:- **आशिया**

13. जगात सर्वात कमी लोकसंख्या कोणत्या खंडात आढळते:- **ऑस्ट्रेलिया**

14. चीनमध्ये 1980 मध्ये कोणते अपत्य धोरण स्वीकारले:- **एक कुटुंब एक मूल**

15. कोणत्या देशाची लोकसंख्या सर्वात जास्त आहे:- **चीन**

16. 2011 च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या किती होती:- **121 कोटी**

17. लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे प्राकृतिक घटक पुढीलप्रमाणे:- **भूपृष्ठ रचना, पर्वतीय प्रदेश, मैदानी प्रदेश, पठारी प्रदेश, हवामान, जलसंपदा, मृदा, खनिजे, जंगले व भौगोलिक स्थान**

18. खालीलपैकी कोणता प्राकृतिक घटक लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करतो:- **अ)भूपृष्ठ रचना** ब)धर्म क)संस्कृती ड)कुटुंब व्यवस्था (वरील घटकावर असा प्रश्न विचारला जाईल)

19. खालीलपैकी कोणत्या ठिकाणी जगामध्ये सर्वात जास्त लोकसंख्या आढळते:- अ)पर्वतीय प्रदेश **ब)मैदानी प्रदेश** क)पठारी प्रदेश ड)वरील सर्व

20. लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे सामाजिक घटक पुढीलप्रमाणे:- **धर्म, संस्कृती, कुटुंब व्यवस्था, सामाजिक एकजिनसीपणा व सामाजिक सुरक्षितता**

21.खालीलपैकी कोणता सामाजिक घटक लोकसंख्येच्या वितरणावर ती परिणाम करतो:- **अ)धर्म** ब)पर्वत क)पठार ड)मैदान (वरील घटकावर असा प्रश्न विचारला जाईल)

22. लोकसंख्येचे जागतिक वितरण:-

१) दाट लोकवस्तीचे प्रदेश:- **लोकसंख्येची घनता दर चौ.कि.मी.ला २०० पेक्षा अधिक**

२) मध्यम लोकवस्तीचे प्रदेश :- **लोकसंख्येची घनता दर चौ. कि.मी. ला ५० ते २०० या दरम्यान**

३) विरळ लोकवस्तीचे प्रदेश:- **लोकसंख्येची घनता दर चौ कि.मी. ला ५० व्यक्तीपेक्षाही कमी**

23. भारतातील लोकसंख्येचे वितरण:-

१) अत्यंत दाट लोकवस्तीचे प्रदेश:- **लोकसंख्येची घनता दर चौ.कि.मी.ला ८०० पेक्षा अधिक**

२) जास्त लोकवस्तीचे प्रदेश :- **लोकसंख्येची घनता दर चौ. कि.मी. ला ४०० ते ८०० या दरम्यान**

३) मध्यम लोकवस्तीचे प्रदेश :- **लोकसंख्येची घनता दर चौ. कि.मी. ला २०० ते ४०० या दरम्यान**

४)विरळ लोकवस्तीचे प्रदेश:- **लोकसंख्येची घनता दर चौ कि.मी. ला २०० व्यक्तीपेक्षाही कमी**

24. जागतिक लोकसंख्येचे वितरण कशाच्या आधारे केले जाते:- **घनतेच्या**

25.जेव्हा लोकसंख्येच्या कमी व साधनसंपत्ती जास्त असते त्यास काय म्हणतात:- **न्यूनतम लोकसंख्या** (Under Population)

26.कोणत्या देशात न्यूनतम लोकसंख्या आढळते:- **स्वीडन, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, जर्मनी, फ्रान्स**

27. न्यूनतम लोकसंख्या असलेल्या प्रदेशातील लोकांचे राहणीमान कसे असते:- **उच्च दर्जाचे**

28. जेव्हा लोकसंख्या व साधन संपत्ती यांचे संतुलन असते तेव्हा त्यास काय म्हणतात:- **पर्याप्त लोकसंख्या** (Optimum Population)

29. पर्याप्त लोकसंख्याची कल्पना 19 व्या शतकात सर्वप्रथम कोणी मांडली:- **एडविन कॅनन**

30.लोकसंख्या वाढीची आदर्श अवस्था कोणती:- पर्याप्त लोकसंख्या

31. तेव्हा लोकसंख्या जास्त व साधनसंपत्ती कमी असते त्यास काय म्हणतात:- **अतिरिक्त लोकसंख्या**

(Over Population)

32. कोणत्या ठिकाणी स्वस्त व मुबलक मजूर पुरवठा होतो:- **अतिरिक्त लोकसंख्येच्या ठिकाणी**

# विभाग III

## लोकसंख्येची गतिशीलता (Population Dynamics)

1.एखाद्या स्त्रीने किंवा स्त्रीच्या समूहाने प्रत्यक्षात किती अपत्यांना जन्म दिला त्यास काय म्हणतात:- **जनन (Fertility)**

2. जिवंत अपत्याला जन्म देण्याची क्षमता म्हणजे काय:- **जननक्षमता**

3. **जननाचे मापने (Measures of Fertility)**

जननाचे मापन करण्यासाठी पुढील पाच परिमाणांचा उपयोग केला जातो.

१) ढोबळ जन्मदर (Crude Birth Rate)

२) साधारण जननदर (General Fertility Rate)

३) वयसापेक्ष जननदर (Age Specific Fertility Rate)

४) एकूण जननदर (Total Fertility Rate)

५) स्थूल प्रजनन दर (Gross Reproductive Rate)

4. खालीलपैकी कोणते जनन मापनाचे परिमाण आहे :-**अ) ढोबळ जन्मदर** ब) ढोबळ मृत्यूदर क) बालमृत्यूदर ड) मातृत्व मृत्यूदर (वरील घटकावर असे प्रश्न विचारले जाऊ शकतात)

5. एखाद्या विशिष्ट प्रदेशातील विशिष्ट वर्षातील एक हजार लोकसंख्येमागे जन्माला आलेल्या जीवित अर्भकांची संख्या म्हणजे काय:- **ढोबळ जन्मदर**

खालील सूत्राचा वापर करुन ढोबळ जन्मदर काढता येतो.

$$\text{ढोबळ जन्मदर} = \frac{\text{एका वर्षात जन्म झालेल्या अर्भकाची संख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times 1000$$

6. **साधारण जननदर (सामान्य जननदर).**

$$\text{सामान्य जननदर} = \frac{\text{एकूण अर्भकाची संख्या}}{\text{प्रजोत्पादनक्षम वयातील स्त्रियांची संख्या}} \times 1000$$

7. **वयसापेक्ष जननदर** –

$$\text{वयसापेक्ष जननदर} = \frac{\text{विशिष्ट वयोगटातील स्त्रियांनी जन्म दिलेल्या मुलांची एकूण संख्या}}{\text{त्याच वयोगटातील स्त्रियांची एकूण संख्या}} \times 1000$$

8. **एकूण जननदार किंवा संपूर्ण जननदर –**

$$\text{एकूण जन्मदर} = \frac{\text{वयसापेक्ष जन्मदारांची बेरीज}}{1000} \times \text{एका वयोगटातील वर्षे}$$

9. **स्थूल प्रजननदर (Gross Reproductive Rate)**

$$\text{स्थूल प्रजननदर} = \frac{\text{मातृत्वयोग्य भावी माता}}{\text{सध्या जननक्षम वयातील १००० माता}}$$

10. जनन दरावर परिणाम करणारे जीवशास्त्रीय घटक पुढीलप्रमाणे:-

१) प्रजोत्पादनाचा कालावधी

२) वंश

३) आहार

४) आरोग्य

11. खालीलपैकी कोणता जीवशास्त्रीय घटक जनन दरावर परिणाम करतो

**अ) प्रजोत्पादनाचा कालावधी** ब) दुय्यम वंध्यता

क) बालमृत्यूदर ड) शिक्षण (वरील घटकावर असे प्रश्न विचारले जाऊ शकतात)

12. जनन दरावर परिणाम करणारे शरीरशास्त्रीय घटक पुढीलप्रमाणे:-

१) प्राथमिक वंध्यता

३) पौगंडावस्थेतील वंध्यता

२) दुय्यम वंध्यता

४) प्रसुत्योत्तर वंध्यता

13. खालीलपैकी कोणता शरीरशास्त्रीय घटक जनन दरावर परिणाम करतो

अ) प्रजोत्पादनाचा कालावधी **ब) पौगंडावस्थेतील वंध्यता**

क) धर्म ड) घटस्फोट (वरील घटकावर असे प्रश्न विचारले जाऊ शकतात)

14. जनन दरावर परिणाम करणारे सामाजिक व सांस्कृतिक घटक पुढीलप्रमाणे:-

१) शिक्षण २) विवाह वय ३) धर्म ४) बहुपलित्व प्रथा ५) अंधश्रद्धा, रुढी व परंपरा ६) घटस्फोट ७) लैंगिक संबंधावर नैतिक बंधने ८) गर्भपाताविषयीचे कायदे ९) कुटुंब नियोजनाचा प्रसार ११) सामाजिक गतिक्षमता १०) एकत्र कुटुंब पद्धतीचा प्रभाव

15. खालीलपैकी कोणता सामाजिक व सांस्कृतिक घटक जनन दरावर परिणाम करतो

**अ) अंधश्रद्धा, रुढी व परंपरा** ब) पौगंडावस्थेतील वंध्यता

क) बालमृत्यूदर ड) आरोग्य (वरील घटकावर असे प्रश्न विचारले जाऊ शकतात)

16. जनन दरावर परिणाम करणारे आर्थिक घटक पुढीलप्रमाणे:- १) कुटुंब उत्पादन पातळी २) औद्योगिकीकरण ३) व्यवसायाचे स्वरुप

17. खालीलपैकी कोणता आर्थिक घटक जनन दरावर परिणाम करतो

**अ) कुटुंब उत्पादन पातळी** ब) बहुपलित्व प्रथा

क) विवाह वय ड) आरोग्य (वरील घटकावर असे प्रश्न विचारले जाऊ शकतात)

18. व्यक्तीच्या जन्मानंतर जेव्हा व्यक्तीच्या जिवंतपणाचा सर्व पुरावा कायमचा नष्ट होतो तेव्हा त्यास काय म्हणतात:- **मर्त्यता (Mortality)**

19. गर्भधारणा झाल्यानंतर जिवित जन्म होण्याच्या अगोदर त्या गर्भाचा मातेच्या उदरातच मृत्यू झालेला असल्यास त्यास काय म्हणतात:- **गर्भमृत्यू**

20. अपत्य जन्म झाल्यानंतर एक वर्षाच्या आत त्याचा मृत्यू झाल्यास त्यास काय म्हणतात:- **अर्भकमृत्यू**

21. मृत्यूदर मापनाची परिणामे किंवा मर्त्यता प्रमाण ठरविण्याच्या पद्धती पुढीलप्रमाणे:-

१) ढोबळ मृत्यूदर (Crude Death Rate)

२) वयसापेक्ष मृत्यूदर (Age Specific Death Rate)

३) लिंगवयोगट मृत्यूदर (Age and Sex Specific Death Rate)

४) बालमृत्यूदर (Infant Mortality Rate)

५) मातृत्व मृत्यूदर (Maternal Mortality Rate)

22. खालीलपैकी कोणते मृत्यूदर मापनाचे परिमाण आहे :-अ) ढोबळ जन्मदर **ब) ढोबळ मृत्यूदर** क) साधारण जननदर ड) स्थूल प्रजनन दर (वरील घटकावर असे प्रश्न विचारले जाऊ शकतात)

23. एका भौगोलिक किंवा प्रशासकीय प्रदेशात दर हजारी लोकसख्येमागे असणाऱ्या सरासरी मृत्यूंचा आकडा म्हणजे काय:- **ढोबळ मृत्यूदर**

ढोबळ मृत्यूदर काढण्याचे सूत्र:-

$$\text{ढोबळ मृत्यूदर} = \frac{\text{एका भौगोलिक/प्रशासकीय प्रदेशात एका वर्षात झालेले एकूण मृत्यू}}{\text{त्या प्रदेशाची एकूण लोकसंख्या}} \times 1000$$

24. **वयसापेक्ष मृत्यूदर:-**

$$\text{वयसापेक्ष मृत्यूदर} = \frac{\text{विशिष्ट प्रदेशातील लोकसंख्येच्या विशिष्ट वयोगटातील मृतांची संख्या}}{\text{त्याच प्रदेशातील त्याच वयोगटातील लोकसंख्या}} \times 1000$$

25. **लिंग वयोगट मृत्यूदर:-**

अ) लिंग वयोगट मृत्यूदर (पुरुष)

$$= \frac{\text{एका विशिष्ट प्रदेशातील एका विशिष्ट वयोगटातील पुरुष मृत्यूसंख्या}}{\text{त्याच विशिष्ट वयोगटातील पुरुष मध्यवर्षीय लोकसंख्या}} \times 1000$$

ब) लिंग वयोगट मृत्यूदर (स्त्रिया)

$$= \frac{\text{एका विशिष्ट प्रदेशातील एका विशिष्ट वयोगटातील स्त्रियांची मृत्यूसख्या}}{\text{त्याच विशिष्ट बयोगटातील स्त्री मध्यवर्षीय लोकसंख्या}} \times 1000$$

**26. बालमृत्यूदर (Infant Mortality Rate):-**

$$\text{बालमृत्यूदर} = \frac{\text{0-१ वयोगटातील मृत बालकांची एकूण संख्या}}{\text{0-१ वयोगटातील एकूण लोकसंख्या}} \times 1000$$

**27. मातृत्व मृत्यूदर (Maternal Mortality Rate) -**

$$\text{मातृत्व मृत्यूदर} = \frac{\text{एका वर्षातील प्रसूती व गर्भधारणेसंबंधी घडलेल्या स्त्रीमृत्यूंची एकूण संख्या}}{\text{त्याच वर्षातील एकूण जीवित जन्मांची संख्या}} \times 1000 \text{ किंवा } 100000$$

28. मृत्यूदरावर परिणाम करणारे लोकसंख्याशास्त्रीय घटक पुढीलप्रमाणे:-

अ) मर्त्यता व लिंगरचना

ब) वय आणि मर्त्यता

29. खालीलपैकी कोणता लोकसंख्याशास्त्रीय घटक मृत्यूदरावर परिणाम करतो

**अ) मर्त्यता व लिंगरचना** ब) दुय्यम वंध्यता

क) शिक्षण व मर्त्यता ड) वाहतूक व्यवस्था व मर्त्यता

(वरील घटकावर असे प्रश्न विचारले जाऊ शकतात)

30. मृत्यूदरावर परिणाम करणारे सामाजिक घटक पुढीलप्रमाणे:-

अ) वैवाहिक स्थिती व मर्त्यता ब) नागरीकरण व मर्त्यता क) शिक्षण व मर्त्यता

ड) वैद्यकीय सुविधा व मर्त्यता इ) वाहतूक व्यवस्था व मर्त्यता

31. खालीलपैकी कोणता सामाजिक घटक मृत्यूदरावर परिणाम करतो

अ) मर्त्यता व लिंगरचना **ब) वैवाहिक स्थिती व मर्त्यता**

क) बालमृत्यूदर ड) वय आणि मर्त्यता

(वरील घटकावर असे प्रश्न विचारले जाऊ शकतात)

32. मृत्यूदरावर परिणाम करणारे आर्थिक घटक पुढीलप्रमाणे:-

अ) व्यावसायिक रचना

ब) अन्नधान्य मुबलकता व मर्त्यता

33. खालीलपैकी कोणता आर्थिक घटक मृत्यूदरावर परिणाम करतो

**अ) व्यावसायिक रचना** ब) वैवाहिक स्थिती व मर्त्यता

क) बालमृत्यूदर ड) वय आणि मर्त्यता

(वरील घटकावर असे प्रश्न विचारले जाऊ शकतात)

## विभाग IV: लोकसंख्या रचना (Population Composition)

1.लोकसंख्येतील स्त्री-पुरुषांची वेगवेगळ्या वयोगटात विभागणी करणे म्हणजे काय:- **लोकसंख्येची वयरचना/ संरचना** (Age Composition)

2. लोकसंख्येतील स्त्री-पुरुष याचे सापेक्ष प्रमाण म्हणजे काय:- **लिंग गुणोत्तर/ लिंग संरचना** (Sex Composition)

3. हजार (1000) पुरुषांमागे स्त्रियांची असलेली संख्या म्हणजे काय:- **लिंग गुणोत्तर/ लिंग संरचना** (Sex Composition)

4. लोकसंख्येतील स्त्री-पुरुषांमधील समतोल कशाने दाखविला जातो:- **लिंग गुणोत्तर/ लिंग संरचना**

**5.** जगामध्ये किती पुरुषांमागे स्त्रियांची संख्या काढली जाते:- **100 पुरुषामागे**

**6.** भारतामध्ये किती पुरुषांमागे स्त्रियांची संख्या काढली जाते:- **1000 पुरुषांमागे**

7. २०११ च्या जनगणना अहवालानुसार भारतात १००० पुरुषांमागे किती स्त्रिया आहेत:- **९४३**

8. 2011 च्या जनगणनेनुसार भारताचे लिंग गुणोत्तर किती आहे:- **९४३**

9. 2011 च्या जनगणनेनुसार भारतातील कोणत्या राज्याचे लिंग गुणोत्तर सर्वाधिक आहे:- **केरळ (1084)**

10. 2011 च्या जनगणनेनुसार भारतातील कोणत्या राज्याचे लिंग गुणोत्तर कमी आहे:- **हरियाणा (879)**

11. 2011 च्या जनगणनेनुसार भारतातील कोणत्या केंद्रशासित प्रदेशामध्ये लिंग गुणोत्तर सर्वाधिक आहे:- **पुडुचेरी (1038)**

12. 2011 च्या जनगणनेनुसार भारतातील कोणत्या केंद्रशासित प्रदेशामध्ये लिंग गुणोत्तर कमी आहे:- **दमण आणि दीव (618)**

13. लिहिता-वाचता येण्याची क्षमता म्हणजे काय:- **साक्षरता (**Literacy)

14. लिहिणे, वाचने, बोलणे आणि ऐकण्याची क्षमता ज्यामुळे आपल्याला प्रभावीपणे संवाद साधता येतो म्हणजे काय:- **साक्षरता (**Literacy)

15. 2011 च्या जनगणनेनुसार भारताची साक्षरता किती आहे:- **74.04 टक्के**

16. 2011 च्या जनगणनेनुसार भारतातील कोणत्या राज्यात साक्षरता सर्वाधिक आहे:- **केरळ (94 %)**

17. 2011 च्या जनगणनेनुसार भारतातील कोणत्या राज्यात साक्षरता कमी आहे:- **बिहार(61.08 टक्के)**

18. 2011 च्या जनगणनेनुसार भारतातील कोणत्या केंद्रशासित प्रदेशामध्ये साक्षरता सर्वाधिक आहे:- **लक्षद्वीप (91.85%)**

19. 2011 च्या जनगणनेनुसार भारतातील कोणत्या केंद्रशासित प्रदेशामध्ये साक्षरता कमी आहे:- **दादरा और नगर हवेली (76.24%)**

20. 2011 च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या किती आहे:- **१.२१ अब्ज**

21. 2011 च्या जनगणनेनुसार भारताची ग्रामीण लोकसंख्या किती आहे:- ८३३ दशलक्ष **(६८.८४%)**

22. 2011 च्या जनगणनेनुसार भारताची शहरी लोकसंख्या किती आहे:- ३७७ दशलक्ष **(31.16%)**

23. 2011 च्या जनगणनेनुसार सर्वाधिक लोकसंख्या असलेले राज्य:- **उत्तर प्रदेश**

24. 2011 च्या जनगणनेनुसार सर्वात कमी लोकसंख्या असलेले राज्य:- **सिक्किम**

25. 2011 च्या जनगणनेनुसार भारताची घनता किती आहे:- **382 प्रती चौ. की.मी.**

26. 2011 च्या जनगणनेनुसार भारतातील सर्वाधिक लोकसंख्येचा जिल्हा:- **विभाजनपूर्व ठाणे (महाराष्ट्रा)**

27. 2011 च्या जनगणनेनुसार भारतातील सर्वात कमी लोकसंख्येचा जिल्हा:- **दिवांग व्हॅल्ही (अरुणाचल प्रदेश)**

28. जागतिक साक्षरता दिवस कधी साजरा केला जातो:- **8 सप्टेंबर**



प्रा.डॉ. एन.के.बनसोडे, भूगोल विभाग, भोगावती महाविद्यालय,कुरुकली